अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## भारताच्या अंडर-१९ संघाने विश्वचषकाच्या फायनलचे तिकिट मिळवले



**बेनोनी** : दक्षिण आफ्रिकेच्या धर्तीवर सध्या अंडर-१९ विश्वचषकाचा थरार रंगला आहे. ५० षटकांच्या या विश्वचषकात भारताने सुरूवातीपासूनच चमकदार कामगिरी केली. मंगळवारी भारताच्या युवा ब्रिगेडने यजमानांना नमवून फायनलचे तिकिट मिळवले. उपांत्य सामन्यात भारतासमोर दक्षिण आफ्रिकेचे आव्हान होते. पण, मराठमोळ्या सचिन धसने शानदार खेळी करून भारताला विजय मिळवून दिला. मूळचा बीडमधील असलेल्या सचिनने ९६ धावांची अप्रतिम खेळी केली.

त्याच्याशिवाय भारतीय कर्णधार उदय सहारनने ८१ धावांची खेळी केली. भारतीय कर्णधाराने १२४ चेंडूत ६ चौकारांच्या मदतीने ८१ धावा करून भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. भारतीय संघाने ४८.५ षटकांत ८ बाद २४८ धावा करून फायनलचे तिकिट मिळवले. सचिन धसने ११ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ९५ चेंडूत ९६ धावांची खेळी केली. आफ्रिकेने दिलेल्या २४५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताला सुरूवातीला ४ मोठे धक्के बसले. आघाडीचे फलंदाज आदर्श सिंग (०), अर्शिन कुलकर्णी (१२), मुशीर खान (४) आणि प्रियांशू मोलिया (५) स्वस्तात माघारी परतले. पण मराठमोळ्या सचिन धस आणि कर्णधार उदय सहारन यांच्यात मोठी भागीदारी झाली. त्यांनी दोघांनी मिळून पाचव्या बळीसाठी १८७ चेंडूत १७१ धावा कुटल्या. आफ्रिकन गोलंदाज बळी घेण्यासाठी तरसताना दिसले.

www.surajyadigital.com ■ बुधवार, दि. ७ फेब्रुवारी २०२४ ■ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १२९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# राज्यात गुंडांचा हैदोस; 'लेटरबॉम्ब'ने सरकार गोत्यात

## खंडण्या आणि धमक्यांनी अभियंते हैराण; संरक्षणाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्रावर गुंडांचा विळखा पडला आहे. महायुतीचे सरकार हे मानायला तयार नाही. उल्हासनगरच्या पोलीस ठाण्यात एक आमदार गोळीबार करतो. ही गुंडगिरी नाही काय? पुण्यात भर दिवसा, भर चौकात नंग्या तलवारी चालवल्या जातात. कोयते नाचवतात. दुकाने लुटतात. माय-भगिनींची छेड काढतात. तरूणीचे अपहरण करतात. ही नाही गुंडगिरी.पुण्यात मंगळवारी गुंडांची ओळख परेड झाली.पोलिसांनी त्यांना तंबी दिली. किती गुंड होते? म्हणे तीनशे.बापरे सांस्कृतिक आणि सुसभ्य शहरात इतके गुंड. ही न्यूज ऐकून सारा महाराष्ट्र डोक्याला हात लावून बसला. हे केवळ पुण्यातच नाही तर राज्यभर गुंडांचा हैदोस सुरू आहे. महायुतीचे सरकार किती काळ डोळे मिटून बसणार? राज्यात गुंडांचा विळखा पडल्याचा प्रकार एका लेटरबॉम्बमुळे उजेडात आला आहे तेव्हा सरकार आता तरी डोळे उघडणार का? असा प्रश्न विचारला जावू लागला आहे.**

राज्यात ठाकरे सरकार सत्तेवर असताना सचिन वाझे प्रकरण समोर आले. गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याकडून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना १०० कोटी रुपयांच्या वसुलीचे टार्गेट देण्यात आल्याचा आरोप तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. त्यानंतर देशमुखांना राजीनामा द्यावा लागला. ते तुरुंगातही गेले. आता राज्यातील महायुती सरकार एका पत्रामुळे अडचणीत आले आहे. त्यावेळी विरोधी पक्षनेते असलेले देवेंद्र फडणवीस आता उपमुख्यमंत्री आहेत. त्यांच्याकडे गृहमंत्रिपद आहे.

### संजय राऊतांच्या पोस्टनंतर चर्चेला सुरुवात

मंगळवारी सकाळी संजय राऊतांनी केलेल्या पोस्टवरून चर्चेला सुरुवात झाली. महाराष्ट्रात गुंडा राज: गुंड आणि दरोडेखोरांनी गुंडांसाठी चालविलेले राज्य! हे महाशय कोण आहेत? त्यांचे नेमके कर्तृत्व काय? याचा खुलासा गृहमंत्री आणि पुणे पोलीस आयुक्तांनी करावा. कायद्याचे राज्य असे असते काय? पुणे संस्कृती आणि विद्येचे माहेरघर होते. आज ही काय अवस्था करुन ठेवली आहे मोदी शाह यांच्या राज्यकर्त्या टोळीने? असा प्रश्न करत संजय राऊतांनी निलेश घायवळचा मुख्यमंत्र्यांबरोबरचा फोटो शेअर केला होता.

निलेश घायवळ कोण?

### पुण्यात ओळख परेड

नवे आयुक्त अमितेश कुमार यांनी मंगळवारी पहिला दणका दिला.पुणे शहरातील सुमारे तीनशे गुंडांची ओळख परेड झाली.त्यात गजा मारणे आणि निलेश घायवळ हे कुख्यात गुंड उपस्थित होते.पोलीस उपायुक्तांनी सगळ्यांची ओळख परेड घेतली.यापुढे पुण्यात एक गुन्हा झाला तर याद राखा,अशा शब्दात या गुंडांना तंबी दिली.



ठाकरे सरकारला वसुली सरकार म्हणणाऱ्या फडणवीस यांचा सहभाग असलेल्या सरकारवर आता विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी 'वसुली सरकार' असा आरोप केला आहे. सरकारी कंत्राटदार आणि अभियंत्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना एक पत्र लिहिले आहे. राज्यातील विविध विकासकामांच्या प्रकल्पांवर काम करणाऱ्या कंत्राटदार आणि अभियंत्यांनी संरक्षणाची मागणी केली आहे. राजकीय गुंडांकडून धमक्या दिल्या जात आहेत, खंडणी मागितली जात आहे, असा दावा पत्रातून करण्यात आला आहे. मागण्या मान्य न झाल्यास काम बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**कोणाचे पत्र? :** महाराष्ट्र स्टेट कॉन्ट्रक्टर्स असोसिएशन (एमएससीए) आणि स्टेट इंजिनीअर्स असोसिएशन (एसईए) यांनी ३ फेब्रुवारीला मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना एक पत्र धाडले आहे. या पत्रातून राज्यातील कायदा, सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. सार्वजनिक प्रकल्पांवर काम करणाऱ्या कंत्राटदार आणि अभियंत्यांना स्थानिक राजकीय गुंडांकडून धमक्या दिल्या जातात. खंडणीसाठी कॉल केले जातात. गुंडगिरी केली जाते, असे आरोप पत्रात करण्यात आले आहेत. राजकीय गुंडांपासून संरक्षण देण्याची मागणी कंत्राटदारांनी केली आहे.

**विरोधक काय म्हणाले? :** राज्य सरकारचे नामकरण वसुली सरकार करायला हवे, अशा शब्दांत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी महायुतीच्या सरकारवर टीका केली. 'कंत्राटदार पत्र लिहून खंडणीच्या तक्रारी करत आहेत. गुंडांपासून संरक्षण देण्याची मागणी करत आहेत. राज्यात असा प्रकार पहिल्यांदा घडत आहे. सत्ताधारी पक्षातील गुंड सरकारनेच मंजूर केलेले प्रकल्प रोखत आहेत. या गुंडांकडून मारहाणीचे प्रकार घडत आहेत,' असेही ते म्हणाले. पुण्यातील कुख्यात गुंड निलेश घायवळ यानं थेट मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याचा मुद्दा सध्या प्रचंड चर्चेत आहे. विरोधी पक्षांनी यावरून शिंदे सरकारला धारेवर धरले आहे. एकीकडे सामान्य माणसाला मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी रांगा लावाव्या लागत असताना दुसरीकडे अशा गुंडांना थेट मुख्यमंत्री भेटतात. हा प्रकार सरकारला शोभत नाही, असेही ते म्हणाले.



### शरद पवारांना सर्वोच्च राजकीय धक्का

## अजित पवार गटाला पक्ष आणि चिन्ह मिळाले

सुराज्य/मुंबई

शरद पवारांना सर्वोच्च राजकीय धक्का बसला असून अजित पवार गटाला पक्ष आणि चिन्ह मिळाले आहे. त्यामुळे आगामी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांना मोठा झटका बसला आहे.

आता निवडणूक आयोगाने अजित पवारांचा मार्ग प्रशस्त केल्याने आता आमदार अपात्रता निर्णय सुद्धा अजित पवारांच्याच बाजूने जाण्याची चिन्हे आहेत. शरद पवार गटाला निवडणूक आयोगाकडून स्वतंत्र गट म्हणून मान्यता देण्यात आली आहे. निवडणूक आयोगाकडून उद्यापर्यंत शरद पवार गटाला चिन्हाबाबत कळवण्यास सांगण्यात आलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या निवडणूक निकालानंतर देवगिरीवर आज अजित पवार गटाची महत्वाची बैठक होत आहे. अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावर ही बैठक होत आहे.

**अजित पवारांसोबत कोण?**

- महाराष्ट्रातील ४१आमदार
- नागालँडमधील ७ आमदार
- झारखंड १ आमदार
- लोकसभा खासदार २
- महाराष्ट्र विधानपरिषद ५
- राज्यसभा १

**शरद पवारांसोबत कोण?**

- महाराष्ट्रातील आमदार १५
- केरळमधील आमदार १
- लोकसभा खासदार ४
- महाराष्ट्र विधानपरिषद ४
- राज्यसभा -३

**निवडणूक आयोगाने काय म्हटलं आहे?**

- अजित पवाराकंडील पक्ष खरा पक्ष आहे.
- पक्ष आणि चिन्ह अजित पवार वापरतील
- दोन खासदार अजित पवार गटाच्या बाजूने
- ५ आमदारांनी दोन्ही बाजूंनी पत्र दिलं
- उद्या ७ फेब्रुवारीपर्यंत पक्षाचं नाव आणि चिन्ह सूचवावं

# विजयकुमार मालकांचे विमान दिल्लीत, डॉ.किरण मालकांची एक्सप्रेस मुंबईत!

## लोकसभेसाठी श्रेष्ठींकडून देशमुखांची चाचपणी; स्थानिक अन् भरघोस व्होट बँकेचा चेहरा म्हणून 'सिद्धेश्वर लीला' मधील मानकरी भाजपच्या केंद्रस्थानी

### लिंगायत समाजाला दुसऱ्यांदा लॉटरी?

### दिल्लीच्या बैठकीनंतर निर्णय

**बापू गटाचे काय?**



सोलापूर लोकसभेसाठी आमदार विजयकुमार देशमुख यांचं नाव पुढे आल्याने आमदार सुभाष देशमुख यांच्या गटात अस्वस्थता पसरली असून दबक्या आवाजात विजयकुमार देशमुखांच्या उमेदवारीची चर्चा सुरु आहे. तथापि, पक्षश्रेष्ठींकडून विजयकुमार देशमुख यांचे काम करण्याबद्दल आदेश येतील. त्यामुळे आमदार सुभाष देशमुख गटाचा नाईलाज होऊ शकतो. पक्षाचा उमेदवार म्हणून सुभाष देशमुख गटाला काम करावे लागणार अशी चर्चा आहे.

सुराज्य/शिवाजी भोसले

**आमदार विजयकुमार देशमुख यांच्याकडे अनुसूचित जाती प्रवर्गाचे प्रमाणपत्र असल्याचे माहीत झाल्यानंतर राखीव सोलापूर लोकसभेसाठी त्यांच्याच उमेदवारीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यांनी खासदकारकी लढवावी यासाठी भाजपमधील श्रेष्ठींकडून चाचपणी सुरु झाल्याची माहिती दै. 'सुराज्य' ला पक्षामधील वरिष्ठ सूत्रांकडून मंगळवारी मिळाली. सोलापूर लोकसभेची खासदारकी विजयकुमार देशमुख यांना बहाल करून त्यांच्याकडील शहर उत्तर विधानसभेच्या आमदारकीचे सिंहासन त्यांचे राजकीय वारसदार सुपुत्र माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांना देण्याचा श्रेष्ठींचा विचार असून त्यादृष्टीने पडताळणी करण्यात येत असल्याची वस्तुस्थितीदर्शक माहितीदेखील सूत्रांनी दिली.**



### देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मालकांची मनधरणी

विजयकुमार देशमुख हे लिंगायत समाजाचे आहेत. सोलापुरात त्यांना मानकरी म्हणून मोठा मान आहे. या समाजात पर्यायाने श्री सिद्धेश्वर यात्रेचे ते मानकरी आहेत. मानकरी म्हणून त्यांच्या घराण्याला वेगळे श्रेष्ठत्व आहे. अशा परिस्थितीत सोलापूर लोकसभेच्या मागास जागेवर निवडणूक लढण्याला त्यांची मानसिकता होईल का अशी शंका उपस्थित केली जात आहे. मात्र, भाजपचे महाराष्ट्राचे देवेंद्र तथा उपमुख्यमंत्री फडणवीस हे विजयकुमार देशमुख यांची सोलापूर लोकसभा लढण्यासंबंधी मनधरणी करु शकतात. त्यांच्या मनधरणीवर देशमुख हे आरक्षित जागेवर लढण्याला तयार होतील, असेही भाजपचे वरिष्ठ सूत्र म्हणाले.

### सुपुत्राच्या आमदारकीचे स्वप्न अन्...

शहर उत्तर विधानसभा मतदार संघामधून तीन वेळा निवडून येत विजयाची हॅट्रिक साधून येथे विजयी झेंडा रोवण्याचा विक्रम करणाऱ्या आमदार विजयकुमार देशमुख यांना आपले सुपुत्र डॉ. किरण देशमुख यांना याच आपल्या होम स्पीच मतदार संघातून आमदार करायचे आहे. तसे त्यांनी आपल्या खास मर्जीमधील अनेकांजवळ बोलूनही दाखविले आहे. पक्ष श्रेष्ठींकडून विजयकुमार देशमुख यांना सोलापूर लोकसभेसाठी पाठविण्याचा निर्णय झाल्यास शहर उत्तरची जागा मोकळी होणार आहे. विजयकुमार देशमुख हे आपल्या सुपुत्रास निवडून आणू शकतात. मुलास आमदार बनविण्याची तयारी त्यांची अंतिम इच्छा पूर्ण होऊ शकते.

### जात प्रमाणपत्राच्या अडचणीचे काय?



आमदार देशमुख यांच्याकडे अनुसूचित जाती प्रवर्गाचे प्रमाणपत्र आहे. या प्रमाणपत्राच्या आधारे ते लोकसभेची निवडणूक लढवू शकतात. उमेदवारी दाखल करताना प्रमाणपत्राच्या पडताळणीचा विषय देखील येवू शकतो. देशमुख यांना असे प्रमाणपत्र मिळाले कसे? कोणी दिले? ते अधिकृत की बनावट हे मुद्दे येऊ शकतील. अशातही विजयकुमार देशमुख हे सोलापूर लोकसभेची निवडणूक लढवू शकतात. तांत्रिक अडचण येणार नाही, अशी चर्चा भाजपच्या वर्तुळात आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता दुसरा धंदा बघा!

| कल्याण |
|---|
| 556-62-688 |

| मुंबई |
|---|
| 469-99-469 |

विशेषत्वे, सोलापूर लोकसभा मतदार संघात विजयाची हॅट्रिक साधताना स्थानिक आणि निष्कलंक लोकाभिमुख चेहरा तसेच लिंगायत समाजाची मोठी हक्काची व्होट बँक यासह अन्य विविध मुद्यांवर आमदार विजयकुमार देशमुख यांच्या उमेदवारीचा चेहरा सरस ठरू शकतो, असा विश्वास श्रेष्ठींना वाटतो. त्यातून सोलापूर लोकसभेच्या उमदेवारींबाबत अधिक घासाघीस न करता देशमुख यांना सोलापूर लोकसभेची निवडणूक लढविण्यासंबंधी गळ घालण्याचा खास प्रयत्न होणार आहे.

### मालकांच्या सकारात्मक बाजू

- ✓ निष्कलंक, निगर्वी, एकनिष्ठ, उत्तम संघटनाचा चेहरा
- ✓ राजकारण आणि समाजकारणामधील प्रदीर्घ अनुभव
- ✓ मुख्य सोलापूर शहरातील लिंगायत समाजासह सोलापूर लोकसभेच्या अन्य ठिकाणाची लिंगायत व्होट बँक येऊ शकते पाठीशी
- ✓ विद्यमान खासदार डॉ.जयसिद्धेश्वर महास्वामी यांचा जसा समाज म्हणून चेहरा निवडणुकीत उजवा ठरला, तसा प्रकार विजयकुमार देशमुख यांच्याबाबतीत होणार निश्चितपणे.
- ✓ आपला माणूस म्हणून लिंगायत समाजाची मोठी व्होट बॅंक आमदार देशमुखांच्या येऊ शकते पाठीशी.
- ✓ सोलापूर लोकसभेमध्ये समाविष्ट असलेल्या विधानसभेच्या प्रत्येक मतदार संघात आमदार देशमुख समर्थक मोठ्या प्रमाणात
- ✓ सोलापूर लोकसभेची निवडणूक लढण्यासाठी देशमुख उभा करु शकतात नेटवर्क
- ✓ सोलापूर लोकसभेची निवडणूक लढण्यासाठी मुख्यत्वे, आर्थिकसह सर्वच आघाड्यांवर देशमुख यांची सक्षमता
- ✓ सामाजिक संतुलन पाहाता सर्वच समाजातील घटकांशी संयमी विजयकुमार देशमुख यांचे स्नेहाचे संबंध आहेत, हे संबंध त्यांच्या लोकसभेसाठी निवडून येण्याला ठरू शकतात उजवे

### मालकांच्या नकारात्मक बाजू

- ✗ लिंगायत समाजामध्ये मानकरी म्हणून मोठा मान असताना मागास जागेवरून निवडणूक कशी लढवायची याचा मोठा पेच
- ✗ मागासवर्गीय जागेवरून निवडणूक लढविण्याने लिंगायत समाजामध्ये प्रतिमा मलिन होईल, का याची भीती
- ✗ आरक्षित जागेवरून निवडणूक लढविली तरी लिंगायत समाजामधील पर्यायाने सोलापुरात असलेला मानकरी म्हणूनचा जो मान आहे, तो मिळण्यात साशंकता
- ✗ खासदार म्हणून दिल्लीत प्रदीर्घ मुक्काम ठोकण्याच्या परिस्थितीत फॅमिलीशी पर्यायाने घरातील वृध्दमंडळींच्याबाबतीत कराव्या लागणार्या तडजोडीची अडचण
- ✗ राजकारणाचा पर्यायाने आमदारकीचा मोठा अनुभव असला तरी खासदारकीचा अनुभव नसल्याच्या अडचणी
- ✗ मतदार संघामधील प्रश्न संसदेत मांडताना हिंदी भाषेची येणार प्रमुख अडचण
- ✗ भाजपमधील असंतुष्ट नेतेमंडळींचा विरोध

### पदाधिकारी म्हणतात आम्हाला निवडणूक सोपी

सोलापूर लोकसभेसाठी विजयकुमार देशमुख हा चेहरा असेल तर सर्वच आघाड्यांचा विचार करता, ही निवडणूक आम्हाला सोपी जाईल, असा विश्वास सोलापूर शहर भाजप पदाधिकारी व्यक्त करीत आहेत. उमेदवारीच्या पार्श्वभूमीवर, अन्य इच्छुक चेहऱ्यांच्या तुलनेत विजयकुमार देशमुख यांची उमेदवारी सक्षम आहे. त्यामुळे विजयाची हॅट्रीक आम्ही निश्चितपणे करु, विजयाचा गुलाल उधळू. आमदार प्रणिती शिंदे यांच्या उमेदवारीची आम्हाला भीती नाही.